# RESEARCH PROCESS

*International Journal of The Social Research Foundation*

INC-DEIS 2020 Special Issue: Volume II


## ARTICLES


१ निवडणुक प्रक्रियेतील सुधारणाविषयीचा समाजशास्त्रीय अभ्यास : शिरूर का. तालुक्याच्या संदर्भात
*– सुधीर येवले* १

२ संस्कृती व पर्यावरण यामधील सहसंबंध
*– अरूणा सावरगावकर* ७

३ कृषी क्षेत्राच्या विकासात शासकीय विहीर अनुदान योजनेचे योगदान (विशेष संदर्भ–फुलंब्री तालुका)
*– मंजुषा मोतीराम नळगीरकर* १४

४ भटक्या–विमुक्त जातींचे उध्दारकर्ते: राजर्षी शाहू महाराज
*– सुरेश वि. धनवडे* २५

५ जागतिक प्रदुषण : आंतरराष्ट्रीय संघटना आणि भारत
*– कल्पना एम. कदम* ३०

६ महाराष्ट्राचा औद्योगिक विकास: एक दृष्टिक्षेप
*– माधवराव नरसिंगराव बिरादार* ३५

७ आदिवासीचा समकालीन विकास आणि समस्यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण
*– रिटा मालचे* ४०

८ पर्यावरण प्रदुषणाची कारणे व उपाय : एक समाजशास्त्रीय अभ्यास
*– डाके राजाभाउ आसाराम आणि सुधीर येवले* ५२

९ गोंड आदिवासी महिलांचे सांस्कृतिक जीवन
*– श्रीमती के.बी.फोले आणि डॉ.रामचंद्र भिसे* ५७

१० भारतीय लोकशाहीतील आधुनिक दबावगटांची भूमिका
*– द्वारकाप्रसाद वि. वायाळ* ६२

११ आदिवासी समाजातील व्यसनाधिनतेचे चिकित्सक अध्ययन (विषेश संदर्भ किनवट तालुका)
*– राठोड वसंत भाऊराव,* ६७

**Research Process ISSN 2321-211X**
**INC-DEIS 2020 Special Issue: Volume II, pp. 25-29**
**© Social Research Foundation**

# भटक्या–विमुक्त जातींचे उध्दारकर्ते: राजर्षीशाहू महाराज

**सुरेश वि. धनवडे**
सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शंकरनगर ता.बिलोली जि.नांदेड
**Email:** sureshdhanwade@gmail.com

*'सामाजिक, राजकीय, आर्थिक व मानसिक परिवर्तन घडवून आणणारे आधुनिक भारताचे शिल्पकार राजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज'. भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांना इंग्रजांच्या काळामध्ये जुलमी, अन्यायी पध्दतीने त्याच्यावर बंधने लादली व त्यांचा विकास दुरापास्त केला. शाहूमहाराजांनी भटक्या–विमुक्त जातींच्या लोकांना केलेल्य कार्यकतृत्वाने भटक्या जमातींना विमुक्तीच्या वाटेवर आणून त्यांना विमुक्त असे पुर्नसामाजिकरणाव्दारे स्वातंत्र्याची दरवाजे उघडी केली. म्हणूनच महाराजांचे कार्य आजदेखिल जिवंत आहे. एवढेच नव्हे तर आजघडीला महाराजांच्या विचारसरणीची अत्यंत आवश्यकता आहे. महाराजांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय व मानसिक परिवर्तन खऱ्याअर्थाने घडवून आणले होते. परंतु सामाजिक व मानसिक परिवर्तनाव्दारे रानटी मानवाला सुज्ञ मानवात रुपांतर केले.*

**[Key Words:** *भटक्या, विमुक्त, जाती, जमाती, गुन्हेगार, बंदिस्त वसाहत, सामाजिक समता, कायदा, गावकुस, बलुते, वतनदार, सामाजिकरण, शिक्षण, सामाजिक परिवर्तन***]**

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत यादीप्रमाणे महाराष्ट्रात भटक्या–विमुक्त जातींची संख्या एकूण ४२ इतकी आहे. त्यामध्ये भटक्या जाती२८ तर विमुक्त 14 जाती आहेत. अज्ञात काळापासून या जाती–जमाती भटकंती करीत आहेत. छोटी–मोठी कला जोपासत भिक्षेकऱ्यांचे जीवन जगत आहेत. या जातींना गावात घर नाही कसायला जमीन सुध्दा नाही; म्हणून भटक्या–विमुक्त्यांचे जीवन एक प्रकारे लाचारीचे जीवन बनले होते. भारतीय समाजातील वंशपरंपरेने आणि सामाजिक प्रथेनुसार गुन्हेगारीवर व भटक्या वृत्तीवर गुजराण करणाऱ्या काही जाति–जमातींना ब्रिटिश अमदानीत गुन्हेगार जाती म्हणून ओळखण्यात येत होते व तशी त्यांची शासकीय नोंद करण्यात येत होती, त्यांच्या हालचालींवर पोलिसांचे नियंत्रण असे. ठरावीक बंदिस्त वसाहतीत पोलिसांच्या देखरेखीखाली राहण्याची सक्ती त्यांच्यावर होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जन्माधिष्ठित विषमतेच्या तत्वावर आधारलेली ही शासकीय प्रथा, स्वतंत्र भारतीय समाजाच्या निर्मितीत पायाभूत म्हणून मानल्या गेलेल्या सामाजिक समतेच्या तत्वाविरुध्द आहे, हे लक्षात आल्यामुळे ब्रिटिश अमदानीतील या जाति–जमातींच्या संदर्भात तयार केलेला गुन्हेगार जमातींचा कायदा रद्द करण्यात येऊन त्यांच्या हालचालींवरील व राहण्यावरील सर्व निर्बंध काढून टाकण्यात आले. म्हणून या जाति–जमातींना स्वतंत्र भारतात 'डीनोटिफाईड' म्हणजे नोंदणीवर्जित किंवा विमुक्त जाति–जमाती या संज्ञेने ओळखण्यात येते.[१]

भटके हा शब्द 'नोमॅड' या इंग्रजी शब्दांचे रुपांतर आहे. 'नोमॅड' हा शब्द 'नेमा' या ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. आणि 'नेमा' याचा अर्थ 'पशुपलक' असा होतो. युरोपियन देशांमध्ये दाट जंगलाच्या अभावामुळे व कुरणांच्या उपलब्धतेमुळे तेथील मानवी

समूह दीर्घकाळ पशुपालक अवस्थेमध्ये होते. परंतु भारतामध्ये मात्र पशुपालक, शिकारी अन्नशोधक या तिन्ही प्रकारचे समूह मानवी संस्कृतीच्या सर्व टप्प्यांत दिसून येतात.

अस्पृश्यांमधील चांभार, ढोर, महार, मांग आदि जाती कितीही हीन समजल्या गेल्या आणि त्यापैकी महार–मांग यासारख्यांना गावकुसाबाहेर बहीष्कृत ठेवले गेले, तरी जाती गावगाड्याचा एक अविभाज्य अंग होता.गावगाड्याचा म्हणून वैशिष्ट्यपूर्ण रचना होती, तिच्यातच त्यांना स्थान दिले गेले होते.

भटक्या–विमुक्त जातीच्या वाट्याला यापैकी काहीही आलेले नव्हते, या जाती गावगाड्याचे अंग नव्हत्या. त्यांना स्वत:चे 'गाव'च नव्हते, तर त्या गावगाड्यात येणार कशा? एका गावाहून दुसऱ्या गावी सतत भटकंती करीत राहणाऱ्या या जाती म्हणजे एक वेगळेच जग होते. त्यांचा गावगाड्याच्या संस्कृतीशी काही संबंध नव्हता. या जाती आदिम जमातीचे अवशेष म्हणून वावरत होत्या. अभ्यासकांनी त्यांना एक प्रकारची राष्ट्रके मानली आहेŸÖ. एखाद्या स्वतंत्र राष्ट्राप्रमाणे त्यांचे कायदेकानून स्वतंत्र होते. त्यानुसार होणारा न्यायनिवाडाही वेगळा होता. हा न्यायनिवाडा करणाऱ्या त्यांच्या जातपंचायती स्वतंत्र होत्या. त्यांचा तथाकथित सुसंकृत समाजाच्या कायदेकानूशी अथवा न्यायव्यवस्थेशी काही संबंध नव्हता (आणि आजही फारसा नाही).

भारतीय समाजरचनेतील भटक्या–विमुक्त जातींचे अध्ययन देश, विदेशातील विद्वानांनी संशोधनपर अध्ययन केले आहे. यापैकी उपलपब्ध व विषयास अधिक समर्पक अशाच घटनांचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेतला आहे. याच अनुषंगाने उपर्युक्त शिर्षकावरून पुढील उद्दिष्टांना अनुसरून केले आहे.

१) भारतीय समाजातील भटक्या–विमुक्त जमातींचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करणे.

२) भटक्या–विमुक्त जमाती आणि भारतीय समाज यामधील परस्पर संबंध जाणून घेणे.

३) संशोधनाद्वारे भटक्या–विमुक्त जमाती या संकल्पनेचे अध्ययन करणे.

४) उत्तर आधुनिकतेत भटक्या–विमुक्त जमातीचे महत्व जाणणे.

५) संकलित माहितीचे विश्लेषण करणे.

संशोधनाची उद्दिष्टे समोर ठेवून अध्ययनात गृहितकृत्ये पुढीलप्रमाणे मांडलेली आहेत.

१) आधुनिक भारताचे शिल्पकार छत्रपती राजर्षि शाहु महाराज आहेत.

२) भटक्या–विमुक्त जमातीचा उध्दार होण्यासाठी नवसमाज सुधारकांची अत्यंत गरज आहे.

**शोधनिबंधाचे महत्व** : प्रस्तुत शोध निबंधाचे मुख्य उद्दिष्ट भारतीय समाजातील भटक्या–विमुक्त जमातींचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करणे उत्तर आधुनिकतेत भटक्या–विमुक्त जमातीचे महत्व जाणणे. त्यावरील उपाययोजनांची अंमलबजावणी करणे आणि लोकशाहीतील स्वातंत्र्याची फळे कशी उपभोगता येईल व संबंध समाजाचा विकास होईल याकडे लक्ष केंद्रीत असले पाहिजे. भारतीय समाजातील एक घटक म्हणून आपल्याला अभ्यासाद्वारे लक्षात येते. सदरील अभ्यासाचा उपयोग सामान्य अभ्यास, शासन यंत्रणा, मानववंशशास्त्राचे अभ्यासक, परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते इत्यादींना होऊ शकेल.

**संशोधन पध्दती** : प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. तसेच शोधनिबंधात दुय्यम स्त्रोतांचा उपयोग, नियतकालीके, शासकीय लेख, वर्तमानपत्रे, वैचारीक लेख, संकेत स्थळे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**भटक्या विमुक्त जाती:**

अशा भटक्या–विमुक्त जाती गावगाड्याचे एक अंग बनून राहणेच शक्य नव्हते. कारण अनादी कालापासून भटकंतीचे जीवन त्या जगत होत्या. त्यापैकी काही जंगलाच्या आश्रयाने राहात होत्या, तर काही सुसंस्कृत समाजाच्या अवतीभोवती भटकत होत्या. अंगी असणारे काही कसब, कला दाखवून त्या जगत होत्या. त्यांच्यापैकी राजसंस्था, सैन्यदले यांच्याशी निगडीत राहून भटकत होत्या. काही ना काही पोटाचा व्यवसाय त्या करीत होत्या. या मुळात चोर, दरोडेखोर नव्हत्या. पण पुढे देशातील राजकीय परिस्थिती पालटली. इंग्रजांनी येथील अनेक राज्ये नष्ट केली. सर्वत्र आपला अमल बसवला. अनेक राजकीय व सामाजिक उलथापालथी झाल्या. त्यात या भटक्यांच्या जीवनपध्दतीस धक्के बसले. त्यांच्यापैकी अनेकांची उदरनिर्वाहाची साधनेच नष्ट झाली, आणि मग त्यांना चोऱ्यामाऱ्यांची वाट धरण्याशिवाय जगण्याचा अन्य पर्याय राहिला नाही. उदाहरणार्थ, बंजारा ही भटकी जात सैन्यदलांना अन्नधान्याच्या रसदी बैलाच्यापाठीवरुन पोहोचविण्याचे काम करीत असे, तर छप्परबंद ही भटकी जात सैन्याच्या राहुट्या उभा करण्याचे, टाकसाळीत नाणी पाडण्याचे काम करीत असे. जेंव्हा हिंदी राज्येच खालसा झाली तेंव्हा ह्या भटक्या जातीही विस्थापित झाल्या. त्यांच्यापैकी अनेकांनी वर सांगितल्याप्रमाणे अवैध मार्गाचा अवलंब चालविला आणि त्या जातीतील लोक मोठ्या प्रमाणावर चोऱ्या, दरोडे, लुटालुट अशा कृत्यात सापडू लागले, आणि मग त्या त्या संबंध जातीच इंग्रजांनी 'गुन्हेगार जात' म्हणून घोषित करण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रात अशा भटक्यापैकी बंजारा कोरवी (कैकाडी), टकारी भामटा, रजपूत भामटा, कंजारभाट, बेरड (रामोशी), मांग—गारुडी, फासेपारधी, छप्परबंद, कटबु, वड्डु इत्यादी १३ भटक्या जाती 'गुन्हेगार' म्हणून घोषित केल्या होत्या. (स्वातंत्र्योत्तर काळात या गुन्हेगार जातीवरील 'गुन्हेगारी' चा शिक्का पुसून त्यांना त्या गुलामगिरीतून मुक्त करण्यात आले. तेंव्हापासून त्यांना 'विमुक्त जाती' असे म्हटले जाऊ लागले.)[३]

इंग्रज हे हिंदुस्थानचे राज्यकर्ते होते. त्यांना आपल्या 'सुसंस्कृतपणा'चा अहगंड होता. तमाम हिंदी लोकांना ते मागासलेले व रानटी समजत होते, तेथे या भटक्या जातीविषयी त्यांची मानसिकता काय असू शकेल, याची आपण कल्पना करु शकतो. राज्यकर्ते या नात्याने हिंदुस्थानात शांतता व सुव्यवस्था निर्माण करुन कायद्याचे राज्य निर्माण करणे, हे आपले आद्य काम आहे, असे ते मानीत होते. ठगांचा व पेंढाऱ्यांचा बंदोबस्त त्यांनी या दृष्टीनेच केला होता. त्यात त्यांना यशही मिळाले होते. देशभर विखुरलेल्या 'गुन्हेगार' जातींचा बंदोबस्त करणे, हाही याच कामाचा एक भाग ते समजत होते. त्या दृष्टीने त्यांनी १८२७ सालापासून सरकारी आदेश काढल्याचे दिसून येते. त्या सालच्या आदेशान्वये या जातींच्या रात्रीच्या संचारावर बंधने घातली गेली, तसेच त्यांच्यावर नजर ठेवण्याचे काम गावच्या पाटलांवर सोपविण्यात आले.[४]

पुढे १८५७ चा उठाव झाला. त्यात या काही भटक्या जातींचा सहभाग उघडकीस आल्याने इंग्रज अधिक सावध झाले. पुढे त्यांनी त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी १८७१ साली खास गुन्हेगार जमाती कायदा जारी केला आणि त्या प्रमाणे देशात ठिकठिकाणी या गुन्हेगार जातींच्या लोकांसाठी 'खुल्या तुरुंगा' ची निर्मिती करण्यात आली. एखाद्या मेंढराच्या कळपाप्रमाणे या लोकांना तारांच्या कुंपणाच्या आत कोंडले जाई आणि मग त्यांना 'सुधारण्यासाठी' अनेक प्रयोग केले जात. पण अनेकदा शिस्तीच्या नावाखाली अत्याचार होत. अशा 'खुल्या तरुंगात ज्यांची सुधारणा होई त्यांना बाहेर काढून शेजारच्या 'मुक्त वसाहती'त राहण्याची परवानगी दिली जाई. जगात स्वत:ला सर्वाधिक सुसंस्कृत मानणाऱ्या इंग्रज राज्यकर्त्यांच्या 'सेटलमेंटस्' धोरणाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूरच्या राजाने अंगिकरलेला मानवतावादी दृष्टीकोन अचंबित केल्याशिवाय राहात नाही. इंग्रजाच्या अनेक भौतिक सुधारणांचे अनुकरण करणाऱ्या महाराजांनी त्यांच्या 'सेटलमेंटस्' धोरणाचे आंधळे

अनुकरण केले नाही. त्यांनी या तथाकथित गुनहेगार जातीसंबंधी वेगळाच मार्ग चोखाळला. हा मार्ग कायद्याच्या बडग्याचा नव्हता, तर अंतरीच्या मानव्यवादी कृतिशीलतेचा होता आणि म्हणूनच त्यांच्या जीवनाच्या वाटचालीत त्यांना भेटलेल्या कुचीकोरवी, वड्डु, डोंबारी, रजपूत भामटा, फासेपारधी इत्यादी अनेक गुन्हेगार समजल्या गेलेल्या जातींना त्यांनी जवळ केले, पोटाशी धरले आणि माणसात आणले. कोरव्यांना तोरगल भागातून आणले तर फासेपारध्यांना कटकोळ भागातून आणले. इतरांचा संचार कोल्हापूर संस्थानात होतच असे. या प्रत्येक जातीच्या लोकांच्या ठिकाणी काही तरी कला होती व त्या कलेत ते तरबेज होते. शरीराने ते काटक व चपळ होते, तर मनाने ते निर्मळ व प्रामाणिक होते. पोट भरण्याचे त्यांचे व्यवसाय अत्यंत क्षुद्र स्वरुपाचे होते. उदा. डोंबारी (कोल्हाटी) जातीचे लोक जनावरांच्या शिंगाच्या फण्या, पक्षांचे पिंजरे अशा वस्तू तयार करीत आणि त्यातून पोट न भागल्याने नाचगाणी, कसरतींचे प्रयोग करुन कशीबशी गुजराण करीत. फासेपारधी तर रानावनातफिरणारी, शिकार करुन पोट चालवणारी जमात. पण निव्वळ शिकारीवर पोट कसे चालावे? तेव्हा चोऱ्यामोऱ्या केल्याशिवाय त्यांना दुसरा पर्यायच नव्हता. चोऱ्या करुन जगणे हाच त्यांच्या जातीचा व्यवसाय बनला होता. परिणामी 'गुन्हेगार जात' म्हणून सर्वात गडद शिक्का फासेपारध्यावर बसला होता.

**शाहू महाराजांचे समीकरण (भटक—विमुक्तांचे सामाजिकरण):**

गुन्हेगार जगातील माणूस म्हणजे जन्मजात गुन्हेगार असून त्यांच्यात कधीच बदल होणार नाही, हे हिंदी समाजाचे व इंग्रज राज्यकर्त्यांचे समीकरण शाहू महाराजांनी स्वीकारण्यास नकार दिला. माणूस इथूनतिथून सारखाच, मात्र परिस्थितीने तो 'साव' अथवा 'गुन्हेगार' बनतो, माणुसकीने, प्रेमाने वागविले तर हिंस्त्र पशुदेखील बदलतो, तर ही माणसे का बदलणार नाहीत, हे नवे समीकरण महाराजांनी मांडले. निव्वळ समीकरण मांडून ते थांबले नाहीत, तर ते अमलातही आणले! कष्टाची व अंगमेहनतीची कामे करणाऱ्या वड्डु व रजपूत भामट्या लोकांना त्यांनी त्यांच्या घरादारांसाठी जागा देवून त्यांना 'स्थिर' केले. आपल्या मालकीचे 'घर' असणारे 'गृहस्थ' बनवून त्यांना समाजात आणले. डोंबाऱ्यांनाही जागा दिल्या. त्यांचीच एक वसती बनवली.

कोरव्यांचा एक रामू नावाचा धष्टपुष्ट जवान पोर महाराजांच्या नजरेत भरताच त्यास त्यांनी खोपटातून उचलून आपल्या राजवाड्याच्या 'लाल आखाड्या'त आणला आणि पैलवानी खुराक सुरु करुन त्यास नामांकित कुस्तिगीर बनवले! या रामूचा पुढे 'कस्तराम' पैलवान म्हणून सर्वत्र नावलौकीक झाला. त्याच्या रुपाने महाराजांनी सर्व कोरव्यास सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली.[६]

सर्व 'गुन्हेगार जाती'त सर्वात 'खतरनाक गुन्हेगार जात' म्हणून फासेपारधी ओळखले जात होते. आपल्या राज्यातील फासेपारध्यांना पकडून तुरुंगात टाकणे किंवा इंग्रजाच्या 'सेटलमेंट्स' प्रमाणे तारेच्या कुंपणाच्या वसाहती तयार करणे, महाराजांना काही अवघड नव्हते. पण तो 'शिक्षे'चा मार्ग न स्वीकारता त्यांनी 'प्रेमा'चा मार्ग स्वीकारला. फासेपारधी चोऱ्यामाऱ्या, दरोडे का करतात, याचा त्यांनी मुळात जाऊन शोध घेतला आणि त्यांच्या लक्षात आले की, समाजाने या लोकास पोट भरण्यासाठी काही अन्य पर्यायच ठेवलेला नाही, बेकारी आणि दारिद्र्य यातच त्यांच्या पापाचे मूळ आहे. ते काढल्याशिवाय त्यांना नीतीचा उपदेश करणे किंवा त्यांच्या गुन्ह्याबद्दल त्यांना शिक्षा ठोठावणे हे चुकीचे आहे.[७]

महाराजांचा एकदा हा विचार पक्का होताच त्यांनी फासेपारध्यांवर एक प्रयोग करण्याचे ठरविले. सर्व जगाच्या दृष्टीने जे 'खतरनाक गुन्हेगार' ठरविले गेले होते, त्यांच्या प्रमुख पुढाऱ्यांनाच त्यांनी आपल्या निवासस्थानाच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविण्याचे

निश्चित केले. नेमबाजीत तरबेज असणाऱ्या फासेपारध्यांचे लाल्या व आरव्या या पुढाऱ्यांनाच महाराजांच्या सोनतळी कॅम्पच्या खास पहाऱ्यावरच नेमले गेले.[८]

समाजाला वाटले की महाराजांनी चोऱ्यांच्या हातीच जामदारखान्याच्या किल्ल्या दिल्या आहेत. पण महाराजांनी फासेपारध्यांमधील 'चोर न पाहता माणूस' पाहावयाचे ठरविले होते. प्रेमाचा प्रतिसाद प्रेमानेच व विश्वासाचा प्रतिसाद विश्वासानेच मिळायला हवा, असे त्यांचे या प्रयोगातील गृहीत हेते. हे गृहीत त्यांनी प्रयोगातील अनेक कसोट्यातून सिध्द करवून घेतले. एकदा ''आज आत कोणालाही सोडायचे नाही'' असा महाराजांनी हुकूम देताच राजाच्या हुकमाची शंभर टक्के तामील करणाऱ्या लाल्या–आरव्याने खुद्द राजाच्या बंधूस– बापूसाहेब महाराजांनाही. आत प्रवेश करु दिला नाही! बापूसाहेब रागाने लालबुंद होताच ते उतरले, ''तुम्हाला आमी जर सोडलं तर राजाचा हुकूम मोडल्यासारखं होईल. तवा ही बंदुक घ्या, आमाला गोळ्या घालून आत जावा.[९]'' लाल्या–आरव्यांनी फासेपारध्यांच्या ठिकाणी असणाऱ्या निष्ठेचे व प्रामाणिकपणाचे दर्शन घडवून महाराजांचा प्रयोग यशस्वी केला होता.

महाराजांनी काही फासेपारध्यांना पहाऱ्यावर घेतले, काहींना शिकारखान्यात कुत्तेवान म्हणून घेतले तर काहींना पोलीस खात्यात नेमले. उरलेल्या फासेपारधी लोकांसाठी रोजगाराची विविध कामे संस्थानात सुरू केली. काहींना रस्ते, विहीर खुदाई, घरबांधणी यासारख्या कामावर ठेवले, तर काहींना राधानगरीच्या धरणाच्या कामावर पाठवले.[१०] पिढ्यानूपिढ्या फासेपारध्यांनी अशी कामे कधी केली नव्हती. पोटासाठी कष्टाची भाकरी मिळण्याची सुसंस्कृत समाजाची ही रीत त्यांच्या ठिकाणी बाणवावी, यासाठी महाराजांची ही सर्व धडपड होती आणि त्यात त्यांना यशही येत होते.

**सारांश:**

शाहूमहाराजांनी भटक्या–विमुक्त जातींच्या लोकांना केलेल्या उपरोक्त कार्यकतृत्वाने भटक्या जमातींना विमुक्तीच्या वाटेवर आणून त्यांना विमुक्त असे पुर्नसामाजिकरणाव्दारे स्वातंत्र्याची दरवाजे उघडी केली. म्हणूनच महाराजांचे कार्य आजदेखिल जिवंत आहे; एवढेच नव्हे तर आजघडीला महाराजांच्या विचारसरणीची अत्यंत आवश्यकता आहे. महाराजांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय व मानसिक परिवर्तन खऱ्याअर्थाने घडवून आणले होते. परंतु सामाजिक व मानसिक परिवर्तनाव्दारे रानटी मानवाला सुज्ञ मानवात रुपांतर केले. छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे भटक्या विमुक्त जातींचे उध्दारकर्ते हे पहिले होत, आणि शेवटचे देखिल. ॲरिस्टॉटलने म्हटले आहे की, 'मनुष्य हा समाजशिल प्राणी आहे'. (Man is a social animal). सदरील पाश्चात्य विचाराचा प्रयोग महाराजांनी वस्तुनिष्ठपणे अवलंब केला आणि रुजवला देखिल होता. महाराजांच्या एकूण कार्याचा आढावा घेत असतांना असे दिसते की, 'सामाजिक परिवर्तन' या संकल्पनेला त्यांचे कार्य सार्थ ठरले आहे. आणि पुढे असे म्हणता येईल की, महाराजांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेला पाहिजे.

**References:**

रेगे मे. पुं., (१९९९), *'मराठी विश्वकोश'*, मुंबई: महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, खंड.१६, (प्रथमावृत्ती), पृ.७५२.
माने लक्ष्मण, (१९९७), *'विमुक्तायन'*, मुंबई: यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण पृ.२.
पवार जयसिंगराव, २००१, *'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ'*, कोल्हापूर: महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, पृ. १०२.

[The final revised version of this paper was received on 15 January 2020]